CMYK

दैनिक
# आरंभ मराठी
www.arambhmarathi.com

■ दैनिक ■धाराशिव ■वर्ष 2 रे ■ अंक 126 ■ रविवार दि.15 जून 2025 ■RNI NO -2023/90078 ■ पाने 04 ■ किंमत रू 5

सुविचार

कष्ट आणि प्रयत्नाशिवाय यश कधीच मिळत नाही.



आपत्कालीन परिस्थितीत पथके सतर्क
पेज ४

# जिल्ह्यातील १०० शाळांमध्ये साजरा होणार अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उद्या प्रवेशोत्सव

## शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी जिल्हाधिकाऱ्यांसह १०० अधिकाऱ्यांची १०० शाळांना भेट

### वाजतगाजत गोड जेवणासह होणार विद्यार्थ्यांचे प्रवेश

### पहिल्याच दिवशी गणवेश आणि पाठपुस्तकांचे होणार वितरण


आरंभ मराठी | धाराशिव

उद्यापासून (दि.१६) शाळेच्या २०२५-२६ च्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत असून, प्रवेश उत्सवाचा हा सोहळा साजरा करण्यासाठी शिक्षण विभागाने जय्यत तयारी केली आहे. यंदा जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांच्यासह जिल्हा परिषदेच्या सर्व विभागाचे वर्ग - १ आणि वर्ग - २ चे १०० अधिकारी प्रवेश उत्सवाच्या सोहळ्याला जिल्ह्यातील १०० शाळांमध्ये उपस्थित राहणार आहेत. तसे आदेश जिल्हाधिकारी यांनी सर्व विभागाला काढले आहेत. यावर्षी पहिली ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व पाठपुस्तके, शालेय गणवेश, बूट आणि सॉक्स देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासोबतच वाजतगाजत आणि गोड पदार्थांचे वाटप करून विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा सोहळा साजरा करण्यात येणार आहे.



उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर उद्या (दि.१६) २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात होत आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी मोठे प्रयत्न केले असून, त्याचे चांगले परिणाम शिष्यवृत्ती परीक्षेतील विविध निकालातून समोर आले आहेत. जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनीही जिल्हा परिषदेच्या शाळेकडे विशेष लक्ष दिले असून, यावर्षी पहिल्या दिवसापासूनच शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करण्याची भूमिका त्यांनी व्यक्त केली आहे. त्याचाच भाग म्हणून यावर्षी प्रवेश उत्सवात जिल्हा परिषदेच्या सर्व विभागाच्या १०० अधिकाऱ्यांनी स्वतः शाळेत जाऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करावे असे लेखी आदेश जिल्हाधिकारी पुजार यांनी दिले आहेत. स्वतः जिल्हाधिकारी पुजार हे कळंब तालुक्यातील भाटशिरपुरा या शाळेत उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. यावेळी पालकमंत्री प्रताप सरनाईक हे ऑनलाइन उपस्थित राहून विद्यार्थ्यांना शुभेच्छा देणार आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष हे कळंब तालुक्यातील मंगरूळ येथील शाळेत उपस्थित राहणार आहेत. तसेच शिक्षणाधिकारी (प्रा.) अशोक पाटील हे तुळजापूर तालुक्यातील अपसिंगा आणि शिक्षणाधिकारी (मा.) सुधा साळुंखे या तुळजापूर तालुक्यातील ताम लवाडी येथील शाळेत उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे स्वागत करणार आहेत. यावेळी प्रत्येक शाळेवर वाजतगाजत विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प देऊन आणि त्यांचे तोंड गोड करून शाळेत स्वागत करण्यात येणार आहे. यावर्षी पहिल्याच दिवशी पहिली ते आठवीतील सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, शालेय गणवेश, बूट आणि सॉक्स यांचे वाटप होणार आहे. यावेळी १ लाख ६३ हजार विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके वाटपाचे नियोजन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

### ९ लाख ५० हजार पुस्तकांचे होणार वाटप




शाळेच्या पहिल्याच दिवशी ९ लाख ५० हजार पुस्तकांचे वाटप होणार आहे. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यातील ताभार्थी असलेल्या १६०४ शाळांमधील इयत्ता पहिली ते आठवीच्या १ लाख ६३ हजार १६६ विद्यार्थ्यांना ९ लाख ५१ हजार ५३३ पाठ्यपुस्तकांचे वाटप होणार आहे. फक्त इयत्ता पहिलीच्या 'खेळू करू शकू' या पुस्तकाच्या १८ हजार ३५७ प्रति व लार्ज प्रिंट पुस्तके मिळालेली नाहीत. ती पुस्तके देखील पुढील दोन दिवसात मिळतील असे शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले.

### अधिकाऱ्यांना द्यावा लागणार शाळा भेट अहवाल

शाळेच्या पहिल्या दिवशी जिल्ह्यातील १०० शाळांना १०० अधिकारी भेट देतील असे नियोजन जिल्हाधिकारी यांनी केले आहे. प्रत्येक अधिकाऱ्याला शाळेचे वाटप करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी अधिकाऱ्यांनी केवळ शाळेला भेट द्यायची नाही तर त्याचा अहवाल जिल्हाधिकारी यांना द्यायचा आहे. या अहवालात शाळेच्या वर्गखोल्यांची स्वच्छता, प्रांगण स्वच्छता, स्वच्छतागृह, किचन यांची स्वच्छता, पाण्याची टाकी, हॅन्ड वॉश स्टेशन, विद्युतसुविधा, पाठ्यपुस्तक व गणवेश वितरण, मध्यान्ह भोजन, वृक्षारोपण व पहिलीतील प्रवेशपात्र विद्यार्थ्यांची संख्या याबद्दल सविस्तर अहवाल द्यायचा आहे.

### साडेचार कोटींचे गणवेश आणि बूट होणार वितरित



२०२५-२६ या शैक्षणिक वर्षात जिल्ह्यातील शासकीय अनुदानित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता पहिली ते आठवी मधील ९३ हजार ४५१ विद्यार्थ्यांना समग्र शिक्षा राज्य शासन व पीएमश्री योजनेमधून प्रति गणवेश रुपये ३०० प्रमाणे एकूण रुपये २ कोटी ८० लाख रुपयांचा निधी गटशिक्षणाधिकारी स्तरावर वाटप करण्यात आलेला आहे. गटशिक्षणाधिकारी स्तरावरून शाळांना गणवेशासाठीचा निधीचे वितरण करण्यात आलेले आहे. तसेच समग्र शिक्षा व राज्य शासन योजनेमधून शासकीय अनुदानित व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इयत्ता पहिली ते आठवी मधील ९६ हजार ३६३ विद्यार्थ्यांना प्रति बूट व पायमोजे रुपये १७० प्रमाणे एकूण १ कोटी ६३ लाख ८१ हजार रुपये निधी वितरित करण्यात आलेला आहे.

## आषाढीसाठी लातूर-पंढरपूर विशेष रेल्वे गाडीचे नियोजन

आरंभ मराठी | धाराशिव

पंढरपूरच्या आषाढी वारीसाठी मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाकडून पंढरपूर आणि लातूर दरम्यान रेल्वेच्या विशेष गाडीचे नियोजन केले आहे. ही आषाढी विशेष रेल्वेगाडी वारकऱ्यांच्या सोयीसाठी धावणार आहे. या गाडीचा फायदा लातूरसह धाराशिव जिल्ह्यातील भाविकांना होणार आहे. पंढरपूर येथे १ ते १० जुलैच्या दरम्यान होणाऱ्या आषाढी वारीत वैष्णवांचा मेळा असतो. राज्याच्या कानाकोपऱ्यासह कर्नाटक, आंध्र प्रदेश व तेलंगणासह अन्य राज्यातील वारकरी भाविक येथे येतात. त्यांच्या सोयीसाठी मध्य रेल्वे दरवर्षी विशेष गाड्यांचे नियोजन करते. लातूर ते पंढरपूर या विशेष गाडीच्या १० फेऱ्या असणार आहेत. गाडी क्र. ०११०१ लातूर येथून २ ते ९ जुलैपर्यंत रोज सकाळी ७.३० वाजता सुटेल व दुपारी १२.५० वाजता पंढरपूर येथे जाईल. गाडी क्र. ०११०२ पंढरपूर येथून वरील सर्व तारखांना १.५० वाजता सुटते, त्याच दिवशी ७.२० वाजता लातूरला पोहोचणार आहे. या गाडीचा वारकरी भक्तांना लाभ होणार आहे.

## कळंब तालुका शिवसेना संघटकपदी शशिकांत पाटील

आरंभ मराठी | गोविंदपूर



कळंब तालुक्यातील खामसवाडी येथील शशिकांत पाटील यांची शिवसेना (उबाठा) कळंब तालुका संघटक पदी निवड करण्यात आली आहे. पाटील यांच्या सामाजिक कार्याची दखल घेवून पक्षश्रेष्ठींनी ही निवड केली. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे .

## 'पालकमंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात सुसंगत आणि सत्य बाबी नाहीत'

आरंभ मराठी | धाराशिव

पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी जिल्हा नियोजन समितीच्या स्थगिती दिलेल्या कामावर जे पत्र मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांना लिहिले आहे त्यातील भाषा सुसंगत आणि सत्य नसून, पालकमंत्र्यांच्या या पत्राचे महायुतीतील घटकपक्ष म्हणून आश्चर्य वाटत असल्याचे मत भाजपा जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केले. पालकमंत्री हे मंत्री असल्यामुळे ते मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री यांच्याशी सहज संपर्क साधू शकतात मात्र तरीही त्यांनी या विषयावर पत्र लिहिले आणि हे पत्र समाजमाध्यमावर व्हायरल केले या कृतीचे आम्हाला आकलन झाले नसल्याचेही दत्ताभाऊ कुलकर्णी यावेळी म्हणाले. पालकमंत्री सरनाईक यांनी जे पत्र व्हायरल केले त्यातून सत्य बाबी समोर येत नसल्यामुळे त्या बाबी समोर आणण्यासाठी ही पत्रकार परिषद घेत असल्याचे कुलकर्णी यांनी स्पष्ट केले. जिल्हा नियोजन समितीच्या निधी वाटपामध्ये अनियमितता आणि गैरप्रकार असल्याचे आमच्या निदर्शनास आले होते. हेच गैरप्रकार आणि अनियमितता थांबावी आणि हे प्रकार पालकमंत्री यांच्या निदर्शनास आणावे या हेतूने भाजपाचे जिल्ह्यातील नेते दिनांक २६ मार्च रोजी पालकमंत्री यांना भेटले होते अशी माहिती कुलकर्णी यांनी दिली. पालकमंत्री यांना काही गोष्टी सांगूनही त्यांनी त्याबद्दल योग्य त्या सूचना त्यावेळी दिल्या नाहीत, त्यामुळे त्या सूचना आम्ही आमच्या पक्षाच्या वरिष्ठांपर्यंत पोहोचवल्या आणि पुढच्या गोष्टी झाल्याचे दत्ताभाऊ कुलकर्णी यावेळी म्हणाले.



महायुतीतील घटकपक्ष म्हणून आम्ही वारंवार संवाद साधण्याचा प्रयत्न केला परंतु पालकमंत्री यांनी मात्र चुकीच्या भाषेत पत्र लिहून ते समाज माध्यमावर व्हायरल करून विसंगत भूमिका घेतल्याचे कुलकर्णी म्हणाले. पालकमंत्र्यांच्या सोबत आम्ही असतानाही ते हतबल होऊन पत्र लिहीत आहेत, त्यामुळे आम्ही लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन याविषयी आमचे मत मांडणार असल्याचे कुलकर्णी यांनी सांगितले. जिल्हा नियोजन समितीच्या निधीला स्थगिती दिल्यामुळे महायुतीतील भाजपा आणि शिवसेना या दोन्ही पक्षातील दरी रुंदावत असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत याचा फटका महायुतीला बसू शकतो अशी शक्यता व्यक्त केली जात आहे.

# तेरणा धरणात ४३ टक्के पाणीसाठा

## यंदा कालव्याला पाणी सुटणार असल्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांना होणार फायदा

सुभाष कुलकर्णी | आरंभ मराठी

तेर -धाराशिव तालुक्यातील सर्वात मोठा प्रकल्प असलेल्या तेरणा मध्यम प्रकल्पाच्या जलाशयात यंदा प्रथमच जून महिन्याच्या प्रारंभी ४३.४० टक्के पाणीसाठा उपलब्ध आहे. यावर्षी धरणाच्या दोन्ही कालव्याच्या दुरुस्तीचे काम झाल्याने व या कालव्याला पाणी सुटणार असल्याने त्याचा ऊस उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. पावसाळ्याच्या प्रारंभीच एवढा मोठा पाणीसाठा धरणात असल्यामुळे धरण लवकरच भरण्याची शक्यता आहे. यावर्षी जवळपास ३०० मिमी पाऊस मान्सून दाखल होण्यापूर्वीच झाला आहे. या पावसामुळे पाणीपातळीत दिवसेंदिवस वाढ होत आहे.



- धरणाची १४ जून २०२५ ची स्थिती
- एकूण क्षमता २०.५५४ एम.सी.एम
- एकूण साठा ९.४३० एम.सी.एम
- मृत साठा ०.८९६ एम.सी.एम
- सध्याचा उपयुक्त साठा ८.५३४ एम.सी.एम
- टक्केवारी - ४३.४०
- आवक - ०.८४ स..घ.मी

गेल्या ५ वर्षांच्या तुलनेत २०२० व २०२१ साली सप्टेंबर मध्ये परतीच्या पावसाने तर २०२२ साली ऑगस्ट महिन्यात तेरणा प्रकल्प ओसंडून वाहिला होता. तर २०२३ मध्ये धरण भरले नव्हते. २०२४मध्ये मात्र धरण सप्टेंबरमध्येच भरले होते. यावर्षी मान्सूनपूर्व पाऊस सुरू होण्याअगोदर तेरणा प्रकल्पात जवळपास ३५ टक्के पाणीसाठा उपलब्ध होता. २०२४ च्या तुलनेत हा पाणीसाठा बराच जास्त होता. यावर्षी तेरणा पट्ट्यात ऊसाची लागवड मोठ्या प्रमाणात झाल्यामुळे या पाण्याचा उपयोग ऊस उत्पादक शेतकऱ्यांना झाला आहे. यावर्षी २०२५ मध्ये मे महिन्यात पडलेल्या पावसामुळे धरणातील पाण्याची टक्केवारी ४३.४० टक्क्यांवर पोहोचली. त्यामुळे चांगल्या प्रकारे पावसाने साथ दिली तर धरण लवकरच भरण्याची शक्यता आहे. ३ कोटी ४१ लाख रूपये खर्चून करण्यात आलेल्या विशेष दुरुस्ती कामाच्या अंतर्गत डावा कालवा १५ किलोमीटर लांबीचा आहे. त्यातून ७५० हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. त्यामुळे तेरणा मध्यम प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रातील येणाऱ्या तेर, रामवाडी, पानवाडी आणि भंडारवाडी या ४ गावातील शेतकऱ्यांना त्याचा लाभ होणार आहे. तसेच १६ किलोमीटर लांबीच्या उजव्या कालव्यातंर्गत ९०२ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आहे. यात तेर, वानेवाडी, डकवाडी, कोळेवाडी, इर्ला या गावातील शेतकऱ्यांना लाभ होऊ शकतो. हवामान खात्याकडून यावर्षी चांगल्या पावसाचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे तेर परिसरात गत वर्षीच्या तुलनेत यावर्षी ऊसाचे क्षेत्र वाढण्यास मदत होणार आहे.

## अवैध गुटखा जवळ बाळगणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | नळदुर्ग

अवैध गुटखा जवळ बाळगणाऱ्या व्यक्तीवर नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी ईसाक गफुर खुदादे (रा. ईटकळ ता. तुळजापूर) हा व्यक्ती दिनांक १३ जून रोजी दुपारी दीड वाजता भाईजान पान शॉपच्या टपरीमध्ये ईटकळ येथे अंदाजे ९,११६ रुपये किमंतीचा महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेला गुटखा तंबाखुजन्य पदार्थ, पानमसाला, सुंगधीत तबांखु विक्री करण्याच्या उद्देशाने जवळ बाळगलेला नळदुर्ग पोलीसांना मिळून आला. यावरुन पोलीसांनी अवैध गुटखा जप्त करून आरोपीविरुद्ध भा.न्या.सं. कलम २७४,२७५, २२३ सह अन्न सुरक्षा व मानके कायदा कलम ५९ अन्वये परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

## जातीवाचक शिवीगाळ करून लैंगिक अत्याचार

आरंभ मराठी | आंबी

महिलेला जातीवाचक शिवीगाळ करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याची घटना भूम तालुक्यातील एका गावात घडली. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की,एका गावातील ५५ वर्षीय महिला (नाव-गावगोपनीय) दिनांक १३ जून रोजी दुपारी अडीच वाजता घरी एकटी असताना एका गावातील चार तरुणांनी तिच्या घरात प्रवेश करून महिलेला जातीवाचक शिवीगाळ केली. तसेच तिला लाथाबुक्यांनी, काठीने मारहाण करून तिच्यावर लैंगीक अत्याचार करून चटणी भरली व महिलेच्या तोंडावर थुंकले. पिडीतेने दिनांक १३ जून रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.न्या.सं.कलम- ६४(१), ७४, ३३३, ११५(२), ३५२, ३५१(२),३५१(३), ३(५) सह अ.जा.ज.प्र.का. कलम ३(१),(आर)(एस)(डब्ल्यु), ३(१)(ए) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

CMYK

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

संपादकीय


रविवार दि.15 जून 2025

# संत चोखोबा आणि त्यांच्या कुटुंबियांविषयीची कृतज्ञता

**वारकरी** संप्रदायातील संतप्रभावळीतील संत चोखामेळा म्हणजेच चोखोबा हे एक महत्त्वाचे संत मानले जातात.त्यांच्याच जीवन व कार्यावरचे अभ्यासपूर्ण विवेचन ज्येष्ठ विचारवंत,साहित्यिक डॉ.आ.ह.साळुंखे यांनी 'चोखिया- चोखियांचे अवघे कुटुंब संत' या त्यांच्या नव्या पुस्तकामधून केले आहे.संत चोखोबा आणि त्यांचे संत कुटुंब यांच्याविषयी लिहिण्याचा विचार आपल्या मनात फार पूर्वीपासून घोळत होता,असे नमूद करुन प्रस्तूत पुस्तकातून चोखोबांविषयी आपण काही नवे सांगत असल्याचा आपला दावा नसून संत चोखोबा आणि त्यांच्या विस्तारित कुटुंबाविषयी आपल्या अंतःकरणात असलेली कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हे लेखन केले असल्याचे प्रांजळ मत आ.ह.सर इथे

मांडतात.तथाकथित अस्पृश्य जातीतला जन्म असल्याने तत्कालिन उच्चवर्णियांकडून होणारी अवहेलना चोखोबा आणि त्यांच्या कुटुंबियांच्या वाट्याला आली होती.पंढरीच्या विठोबाला आपले आराध्य दैवत मानून सबंध कुटुंबियांनी अभंगरचना केली.ज्यामधून विठ्ठलभक्ती,स्वतःवर होत असलेला सामाजिक अन्याय,धार्मिक थोतांडे,कर्मकांडाची निरर्थकता अशा विषयांवर परखड मतप्रदर्शन केले.यातून संत चोखोबा आणि त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची परम विठ्ठलभक्ती प्रत्ययास येतेच पण त्याचबरोबर सामाजिक तिरस्काराचा पावलोपावली सामना करताना येणारा दाहक अनुभवही आपल्यापर्यंत अतिशय ताकदीने पोहोचतो.त्यामुळे तत्कालिन कर्मठ धर्ममार्तंडांविरुद्ध एका दुर्बल घटकातील संत आणि त्यांच्या कुटुंबाने पुकारलेला हा एक विद्रोहच होता याचीही साक्ष पटते.अत्यंत प्रतिकूल काळात भयंकर हालअपेष्टा सहन करीत धार्मिक व सामाजिक दहशतीला थेट आव्हान देणाऱ्या संत चोखोबांच्या ऐतिहासिक कार्याचे आ.ह.कृत हे मूल्यमापन वाचणे ही एक आगळीवेगळी वाचनानुभूती ठरते.'विद्रोही तुकाराम' या क्रांतदर्शी पुस्तकानंतर अन्य एका वारकरी संतश्रेष्ठांवर प्रकाशित झालेली डॉ.आ.ह.साळुंखे सरांची 'चोखिया' ही आणखी एक महत्त्वाची साहित्यकृती होय. महाराष्ट्रात तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि चौदाव्या शतकाच्या पूर्वार्धात होऊन गेलेल्या शोषक समाजव्यवस्थेविरुद्ध आवाज उठविणारे महान संत चोखामेळा,त्यांच्या पत्नी सोयराबाई,त्यांचा मुलगा कर्ममेळा,चोखोबांची धाकटी बहिण निर्मळाबाई,त्यांचे पती बंका अशा एकाच कुटुंबातील पाच संतांच्या कैक अभंगांचा दाखला देत त्या अभंगांचा अर्थ उलगडवून दाखविणारी मांडणी 'चोखिया' या पुस्तकामधून आपल्यापुढे येते.पंढरपूर आणि मंगळवेढा हे कार्यक्षेत्र असलेल्या या संतांचा संत नामदेव आणि संत ज्ञानदेव तसेच त्यांच्या भावंडांशी संपर्क आला होता.वारकरी संप्रदायाची नुकतीच सुरुवात झाली होती.सनातनी,कर्मठ धर्मावलंबी कट्टरतावाद्यांची बजबजपुरी माजलेली असताना समतावादाचा आग्रह धरणारी,सर्वांना प्रेमाने कवटाळणारी वारकरी चळवळ किंवा आंदोलन समाजातील तळागाळात लोकप्रिय होत असल्याच्या काळात चोखोबा आणि अन्य वारकरी संतजन आपले विचार जनलोकांत मोठ्या धाडसाने पसरवीत होते.अतिशय कर्मठ असा तो काळ.धर्म आणि सामाजिक रुढींच्या नावाखाली तथाकथित अस्पृश्य समाजातील लोकांवर अत्याचार केले जात असत.तसे असूनही विठ्ठलभक्तीचा छंद जडलेल्या चोखोबांनी उघडपणे वेदप्रामाण्याचा निषेध नोंदवल्याचे दिसून येते.विठ्ठलापुढे आम्हांला अन्य कुठल्याच गोष्टीची महत्ता वाटत नसल्याचे ठणकावून सांगणाऱ्या चोखोबांनी सनातन्यांचा महारोष ओढवून घेतला होता,वर्णश्रेष्ठत्वाने अंध झालेल्या समाजाला विठ्ठलभक्तीचे मर्म सहज आणि सोप्या भाषेत समजावणारे चोखोबा खरोखर लोकविलक्षण रसायनच होते. 'चोखिया' या पुस्तकामधून संत चोखोबांविषयी मांडणी करताना महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दृष्टिकोनाचीही चर्चा करण्यात आली आहे. त्यातून बाबासाहेबांच्या मनात चोखोबांविषयी आदरच असल्याचे दिसून आल्याचे ठळक उदाहरणांनी स्पष्ट केले आहे. वेदशास्त्रे-पुराणे,शूद्र आणि विठ्ठल यांच्याविषयी संत चोखोबांनी आपल्या अभंगांमधून

निःसंदिग्धपणे लिहिले आहे.शोषणशाहीने हीन ठरवलेल्या जातीत जन्म घेऊनही बाणेदारपणे अन्यायाविरुद्ध लिहित,बोलत राहिलेल्या चोखोबा आणि त्यांच्या कुटुंबियांची कामगिरी 'न भूतो न भविष्यती' अशीच होती असे गौरवोद्गार या पुस्तकात







डॉ.आ.ह.साळुंखे काढतात.वेदांच्या श्रेष्ठत्वाला सरळ आव्हान देणाऱ्या या संतप्रभृतींच्या धाडसाची नोंद संत नामदेवांनी सुद्धा घेतलेली आहे.संत नामदेव हे तर संत चोखोबांना गुरुस्थानीच होते. पुराणमतवादी संस्कृतीने लादलेल्या अनेक धारणांना चोखोबांनी आपल्या अभंगांमधून धुडकावले आहे. वर्ण,जात,भेदाभेद अशा अन्यायी व्यवस्थेने पिचलेल्या समाजात चोखोबा जे धारिष्ट्य दाखवित होते,त्या 'अपराधा'ची ते शिक्षादेखील भोगत होते.पंढरपूरातील विठ्ठलमंदिरातील बडवे आपणांस मारतात,असा स्पष्ट आरोप त्यांनी एका अभंगात केला आहे.तो अभंग पुढीलप्रमाणे,'धाव घाली विठू आता चालू नको मंद मज मारिती बडवे काही तरी अपराध' बडव्यांनी त्यांच्यावर चोरीचा आळदेखील आणला,अशा संकटांना वा छळाला न डगमगता चोखोबा धिरोदात्तपणे विठ्ठलभक्तीत लीन होते,अभंगरचनेमधून आपल्यावरील अन्यायाला वाचा फोडतानाच प्राणप्रिय विठुरायाशी हृदयसंवाद साधत होते.वर्ण,जात ही मानवद्रोही क्रूर व्यवस्था आपल्या समाजात उघडपणे अस्तित्वात होती ज्याचे भयंकर चटके चोखोबांसारख्या संवेदनशील संतांना बसत होते.त्यातूनच त्यांची काळीजवाणी अभंगवाणीमधून प्रसवत होती.वैदिक व्यवस्थेला आव्हान ठरत चाललेल्या आणि धार्मिक अवडंबर झिडकारुन सहज,सोपा विठुभक्तीचा अध्यात्ममार्ग असलेल्या वारकरी संप्रदायाला तत्कालिन सनातन्यांकडून प्रचंड विरोध होत होता. कारण मूठभर कर्मठांची धार्मिक मक्तेदारी त्यामुळे संपुष्टात येत होती.अशावेळी चोखोबा व त्यांच्या कुटुंबातील चारही संतांनी जप,योगयाग,तप अशा थोतांडांना निकालात काढले होते! उलट अशा गोष्टींच्या कच्छपि लागणारांची त्यांनी यथेच्छ टर उडवली होती.विठूनामाचे स्मरण करण्याचा सरळमार्ग वारकरी धर्माने प्रचलित केला,जो कष्टकरी समाजाने उचलून धरला,त्यामुळेच चोखोबा आणि सकल वारकरी संतजन तडफेने अभंगरचना उच्चारीत,या समताधर्माचा प्रचार,प्रसार करीत सर्वदूर फिरत होते.सामाजिक नैतिकतेचे धडे देणारी नवी व्यवस्था रुजवू पाहणाऱ्या विठुभक्तांचा हा संघर्ष मोठा होता,त्याच वारीआंदोलनाचे चोखोबा हे निष्ठावंत वारकरी होते.खरे संत कोणाला म्हणावे? याचे सुंदर विवेचन आपल्या अभंगांमधून चोखोबा आणि इतरांनी आपल्या अभंगवाणीतून केल्याचे डॉ.आ.ह.साळुंखे जाणीवपूर्वक नोंदवितात.'संत,भक्त आणि मित्र' या प्रस्तुत पुस्तकाच्या सातव्या प्रकरणात ते म्हणतात,'चोखोबांच्या अभंगातील वर्णने खरोखरच भावनिक बनवणारी आहेत.चोखोबा जरी ( तथाकथित ) अस्पृश्य जातीमध्ये जन्माला आलेले असले,तरी त्यांच्या वस्तीमध्ये त्यांच्या बालपणी त्यांनी आपल्या सवंगड्यांबरोबर विविध अनुभव नक्कीच घेतले असणार,त्यामुळेच त्यात इतकी जिवंतता आढळते.धर्मशास्त्रे अथवा रूढीपरंपरा त्यांच्यावर बंधने व दडपणे लादू शकत नव्हत्या.'संत चोखोबा महाराजांनी आपल्या समकालीन वारकरी संतांविषयी अत्यंत आदराचे उद्गार काढले आहेत.संत जनाबाई,संत नरहरी,संत गोरोबा,संत सावता,निवृत्तीनाथ,संत ज्ञानेश्वर यांच्याविषयी आपल्या अभंगांमधून चोखोबांनी कृतज्ञता,प्रेम अशा भावना व्यक्त केल्या आहेत. संत नामदेवांशी मात्र चोखोबांचा नित्य संवाद घडत होता, चर्चा झडत होत्या हे सहजपणे जाणवते. नामदेव महाराज आणि चोखोबा यांच्यातले अतूट अद्वैत इतके घट्ट होते की पुढे मंगळवेढ्यात निधन पावलेल्या चोखोबांच्या अस्थी पंढरपूरात आणून विठ्ठल मंदिराजवळ त्यांची समाधी उभी करण्यातही नामदेवांनीच पुढाकार घेतला होता.वारकरी संतसमुदायाचे नेतृत्व करणाऱ्या संत नामदेवांनी वारकरी संप्रदायाच्या उत्थानासाठी अनेक अभिनव संकल्पना राबविल्या होत्या,ज्यात मग्रूर समाजव्यवस्थेने नाकारलेल्या चोखोबांसारख्या संतश्रेष्ठांना मुख्य प्रवाहात आणण्याची थोर कामगिरीही होती.संत चोखोबा आणि त्यांच्या परिवारातील संतांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याची संधी आपणांस प्रस्तुत पुस्तकलेखनाच्या रुपाने मिळाल्याने आपल्या डोक्यावरचे एक संकल्पओझे कमी झाले असल्याचे आ.ह.सर नमूद करतात.पूर्वजांनी केलेल्या अन्यायाबद्दल क्षमा मागू शकलो असल्याची भावनाही ते व्यक्त करतात.आजही चोखोबा आणि त्यांच्या सर्व कुटुंबिय संतांचे कार्य समाजात जिवंत असल्याचे तसेच सामान्य लोक अजूनही त्यांना विसरले नसल्याची बाब आनंददायी असल्याचे नोंदवितात.'हजार मर्यादा असतील त्यांच्या, पण ते आपले हितचिंतकच होते,ते शोषक नव्हते तर शोषित होते.' ही महत्त्वाची बाब ध्यानी घेऊन मग आपण शोषकांच्या बाजूने उभे राहायचे की शोषितांच्या?असा रोकडा सवाल डॉ.आ.ह.साळुंखे सर 'चोखिया' या पुस्तकाच्या निमित्ताने आपणांस करतात.



भरत यादव
yadavbh515@gmail.com
9890140500

पुस्तकाचे नावः
'चोखिया-चोखियांचे अवघे कुटुंब संत'
लेखकः- डॉ.आ.ह.साळुंखे
प्रकाशकः-लोकायत प्रकाशन,सातारा
पृष्ठसंख्याः २६४ मूल्यः ३८०₹

# प्रत्येक वादळात खंबीरपणे उभे राहणारे फक्त माय-बापच!

**वडिलांचा** मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी जून महिन्याच्या तिसऱ्या रविवारला पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो. त्या अनुषंगाने यावर्षी पितृदिन (फादर्स डे) १५ जून २०२५ रोजी रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते. या जगात माय-बापा शिवाय मोठा कोणीही नाही. आई-वडील, माय-बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही.कारण आई- वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी या शब्दाशी घनिष्ठ व निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती,संस्कार,संस्कृती,जडण-घडण सर्वत्र दिसून येते. ज्याप्रमाणे आई-वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची (मुलांची) जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात. ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई-वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही.कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई-वडीलांची भुमिका समान असते.आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई- वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा. वडीलांचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजेच. परंतु जगाला जाण रहावी म्हणून ठराविक दिवशी पितृ दिनाला महत्व आहे. पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे.त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली.१९०७ मध्ये प्रथमच पितृदिन अनधिकृतपणे साजरा करण्यात आला. यानंतर अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत. मातृत्व दिन (मदर्स डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो. जगात आई-वडील या शब्दाला कुठेही तोड नाही. कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका -काकु,माऊशी-मावसा, आत्या-मामा,ताई-दादा,आजी-आजोबा इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत.परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल.उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी -पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल.मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे वडिलांच नात असते.वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते.कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते व पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते. कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते.त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल फक्त आईलाच कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते. आई अशी दैवी शक्ती आहे की मुला-मुलीनसाठी आकाश-पाताळ एक करते. परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही. आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करीत असते.आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न भूतो न भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे.कारण वडिल भुक- तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ



देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते. कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते. म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही. म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे. आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविना आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणीना-कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते. या उलट वडिलांचे आहे. एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. म्हणजेच वडील तीथेच नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते. कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते. कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते. त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करने,पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक पितृदिन दीसुन येईल.माझ्यामते पितृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा.दररोज का साजरा का करू नये? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दु:ख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे. कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई-वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल.पितृत्व दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृती जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल.पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व ॲटी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी- आजोबा,काका-काकु,मामा-मामी, आत्या-मामा,ताई-दादा इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे. त्यामुळे अंकल-ॲन्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे. त्याचबरोबर मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मान अवश्य होईल असे मला वाटते. आपण १५ जूनला पितृदिन (फादर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा. कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने निसर्ग दिवसेंदिवस कोपत आहे.याकरीता जागतिक पितृत्व दिनाचे औचित्य साधून प्रत्येक



रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार )
नागपूर
मो.नं.९९२१६९०७७९,

मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे. यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात करोडोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल. यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल. कारण आज बदलत्या हवामानामुळे निसर्ग दिवसेंदिवस ढासळत आहे.त्यामुळे आई-वडीलांपेक्षा मोठी आणि महान म्हणजे धर्तीमाता (पृथ्वी) ज्यामुळे आज आपण या पृथ्वीतलावर सुखरूप आहोत.परंतु वाढत्या शहरीकरणामुळे व औद्योगिकीकरणामुळे जंगलतोड मोठ्या प्रमाणात होत असल्याने पृथ्वीमाता आज धोक्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे.त्यामुळे तीला वाचविण्याची जबाबदारी आज आपल्या सर्वांवर आली आहे. करिता पृथ्वीला आई-वडीलांचा दर्जा देवून मोठ्या प्रमाणात सर्वच स्तरातून वृक्षलागवड व्हायला हवी.यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूच्या रक्षणासाठी मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित ठेवण्यासाठी आणि ऑक्सिजनची मात्रा वाढविण्याच्या दृष्टीने हा आगळावेगळा उपक्रम ऐतिहासिक ठरेल.

# मृत्यूला न चुकवी कोणी..

**सरदार** वल्लभभाई पटेल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाण केल्यानंतर अवघ्या काही सेकंदांत लंडनकडे निघालेले एअर इंडियाचे विमान गुरुवारी दुपारी नागरी वस्तीत कोसळले. या अपघातात २७४ जणांचा मृत्यू झाला.कोणतीही नैसर्गिक अथवा मानवी आपत्ती ही दुःखदायकच असते. वित्तहानी भरून काढता येते, पण जीवितहानी भरून निघत नाही. मृत्यू हा मृत्यूच असतो. अकाली आलेला मृत्यू नातेवाईकांना आणि परिवारातील सदस्यांना मोठा धक्का देणारा असतो. या अपघातामागे तांत्रिक अडचणी अथवा मानवी चुका असल्या,तरी घडलेली घटना ही दुर्दैवीच होती.वैमानिक आणि या तंत्रज्ञानाशी संबंधित काम करणारे लोक हे अतिउच्च बुद्धिमत्ता असणारे असतात. अनेक कसोट्या आणि अनुभवांच्या आधारेच त्यांची या जोखमीच्या क्षेत्रात निवड केली जाते. या अपघातग्रस्त विमानातील 'ब्लॅक बॉक्स' सापडला आहे. विमान अपघातानंतर दोन गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या

असतातफ्लाइट डेटा रेकॉर्डर (FDR), ज्यामध्ये विमानाशी संबंधित सर्व आकडेवारी असते, आणि

कॉकपिट व्हॉईस रेकॉर्डर (CVR), ज्याद्वारे वैमानिक व कर्मचाऱ्यांचे संभाषण रेकॉर्ड केले जाते. यांनाच 'ब्लॅक बॉक्स' म्हटले जाते. ऑस्ट्रेलियाचे शास्त्रज्ञ डेव्हिड वॉरेन यांनी १९५० च्या दशकात ब्लॅक बॉक्सचा शोध लावला

होता. IIT दिल्लीने केलेल्या अभ्यासानुसार, २०१८ ते २०२२ या पाच वर्षांमध्ये भारतात दरवर्षी सरासरी दीड लाखांहून अधिक लोक रस्ते अपघातात मृत्युमुखी पडतात. अर्थातच, हा आकडा विमान व इतर वाहतुकीच्या अपघातांपेक्षा जास्त आहे. म्हणजेच, विमानप्रवास हा तुलनेने अधिक सुरक्षित मानला जातो. एक कोटी उड्डाणांपैकी केवळ एका उड्डाणाला अपघाताची शक्यता असते. तरीसुद्धा मानवाला विमान प्रवास आणि जलप्रवास हा रस्ते प्रवासापेक्षा धोकादायक वाटतो. खरंतर ही एक नैसर्गिक आणि अदिम भावना असली पाहिजे. विमान अपघातांची प्रमुख कारणे म्हणजे यांत्रिक बिघाड, मानवी चूक, नैसर्गिक आपत्ती, अथवा घातपात ही असू शकतात .अहमदाबाद विमान दुर्घटनेतील विमान 'एअर इंडिया फ्लाईट -१७१' हे बोईंग ७८७ बनावटीचे अंतरखंडीय विमान होते. या अपघाताच्या दिवशी बोईंग कंपनीचे अमेरिकेतील शेअर्स ४ टक्क्यांनी घसरले. यावरून स्पष्ट होते की, विमान अपघाताचा परिणाम केवळ एका देशापुरता मर्यादित राहत नाही, तर त्याचे आर्थिक आणि सुरक्षेशी संबंधित पडसाद आंतरराष्ट्रीय स्तरावर उमटतात. त्यामुळे अशा घटना इतर देशांनाही धडा देतात आणि त्यांच्या विमानवाहतुकीतील सुरक्षाविषयक धोरणांमध्ये सुधारणा घडवून आणतात.या विमान अपघातात एकूण २४१ प्रवासी आणि क्रू मेंबर्स जागीच मृत्युमुखी पडले. उर्वरित ३३ बळी हे विमान ज्या इमारतीवर कोसळले त्या अहमदाबादच्या बी.जे. मेडिकल कॉलेजच्या कॅम्पसमधील राहिवासी, विद्यार्थी, डॉक्टर, हॉस्पिटल कर्मचारी व मेघाणी नगर परिसरातील नागरिक होते.या घटनेनंतर मराठीतील एक भावगीत आठवते : ''मृत्यूला न चुकवी कोणी थोर असो अथवा सान,सोड सोड माया सारी, आहे जग हे नश्वर...'' खरंतर मृत्यू ही मानवी जीवनातील अटळ गोष्ट आहे. संवेदनशील लोक मृत्यूविषयी अधिक चिंता करतात, तर निष्काळजी किंवा बेधडक वृत्तीचे लोक मृत्यूविषयी बेफिकीर असतात. या अपघातानंतर अनेकांच्या कहाण्या माध्यमांतून समोर येत आहेत.

या दुर्घटनेत केवळ एकमेव व्यक्ती वाचू शकलाब्रिटनचे विश्वास कुमार रमेश. विमानतज्ज्ञांच्या मते, अशा अपघातांत एकच व्यक्ती वाचणं हे अत्यंत दुर्मिळ आहे. जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी त्याला हॉस्पिटलमध्ये भेटायला गेले, तेव्हा विश्वासने सांगितलं-''सगळं माझ्यासमोर घडलं. मी कसा वाचलो यावर माझाही विश्वास बसत नाही. डोळे उघडले तेव्हा मला बेल्ट काढता आला आणि मी बाहेर पडलो. मी ज्या बाजूला होतो, तिथं हॉस्टेलच्या खालची बाजू होती. तिथं थोडी जागा होती. जागा दिसली आणि मी प्रयत्न केला, बाहेर पडलो. मी चालत बाहेर आलो. आगीमुळे माझा डावा हात भाजला आहे. नंतर रुग्णवाहिकेतून मी हॉस्पिटलमध्ये आलो.''खरंच, 'काळ आला होता पण वेळ आली नव्हती!' असंच म्हणावं लागेल. या दुर्घटनेतील आणखी एक हृदयद्रावक बाब म्हणजे पायलट सुमित सभरवाल यांचा मृत्यू. अविवाहित सुमित आपल्या ८८ वर्षांच्या आजारी वडिलांसोबत राहत होते. ''लंडनला पोचल्यानंतर कॉल करतो,'' हा सुमितचा आपल्या वडिलांना दिलेला शेवटचा निरोप ठरला. वृद्ध वडिलांनी आपल्या तरुण मुलाचा मृत्यू पाहणं ही अतिशय क्लेशदायक गोष्ट आहे. शासनाने मृतांच्या वारसांना एक कोटी रुपयांची मदत जाहीर केली आहे. यावर मृत्यू झालेल्या एका व्यक्तीच्या मुलीने जिचे नाव फाल्गुनीआहे. तिचे म्हणणे असे आहे की , ''मी सरकारला दोन कोटी रुपये देते, पण मला माझे वडील परत आणून द्या!'' तिची भावना समजण्यासारखीच आहे. गेलीली व्यक्ती कोणत्याच मार्गाने परत आणता येत नाही, हे जीवनाचं कठोर सत्य आहे.या अपघातात गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचाही मृत्यू झाला. त्यांचा 'लकी नंबर' १२०६ होता. त्यांच्या स्कूटर आणि कार यांचे नंबर सुद्धा १२०६ असेच आहेत. त्या दिवशीची तारीख आणि महिना एकत्र केल्यासही १२०६ हेच समीकरण जुळते.शेवटी लकी आणि अनलकी नंबरकडे कोणी कसा पाहतो, हा वैयक्तिक विचाराचा भाग आहे.

राजस्थानच्या बालोतरची खुशबू लग्नानंतर प्रथमच आपल्या नवऱ्याला भेटण्यासाठी लंडनला निघाली होती. आता तिचा नवरा तिला कायमची वाट पाहत राहील कारण ती परतणारच नाही.नीरज लवानिया आपली पत्नी अपर्णा हिचा पन्नासावा वाढदिवस लंडनमध्ये साजरा करण्यासाठी निघाले होते. त्यांच्या अपूर्ण स्वप्नांचा अंत या अपघाताने केला.मृत व्यक्ती निघून जातो, पण त्याच्या आठवणी, त्याची रिकामी जागा कुटुंबीयांच्या आयुष्यात कायम राहते. मृत्यू हा जीवनातील सर्वात दुःखदायक प्रसंग असतो. जीवनभर संघर्ष करत जगलेली व्यक्ती शेवटच्या क्षणी अंतिम आणि महाभयंकर संकटाशी सामना करत अखेर हरते आणि कायमची निघून जाते. मागे राहतात केवळ तिच्या आठवणी.अहमदाबाद विमान दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या सर्व व्यक्तींना श्रद्धांजली आणि त्यांच्या कुटुंबीयांना या दुःखातून सावरण्याचे बळ मिळो, हीच प्रार्थना!



किशोर जाधव,
सोलापूर
मो.९९२२८८२५४१

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक चंद्रसेन गोविंदराव देशमुख यांनी आदेश प्रिंटर्स, रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव, ता. जि. धाराशिव येथे छापुन रामकृष्ण कॉलनी, गवळी वाडा, धाराशिव (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. (न्यायीक क्षेत्र धाराशिव ) संपादक श्री. चंद्रसेन गोविंदराव देशमुख. मो.नं. ९८२२५९३९८० RNI NO.- 2023/90078

# रक्ताविना नाही रे प्राण..!

जागतिक 'रक्तदान' दिवस. संपूर्ण जगभरातील रक्तदात्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. २००४ पासून जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) वतीने संपूर्ण जगभरात १४ जून हा दिवस 'रक्तदान दिन' म्हणून साजरा केला जातो. ए- बी -ओ या गटांचा शोध लावणारे आणि रक्तदात्यांच्या संकल्पनेला व्यापक शास्त्रशुद्ध पद्धतीने मांडणारे ऑस्ट्रियाचे नोबल विजेते डॉ.कार्ल लॅन्डस्टेनर यांच्या जन्मदिनानिमित्त रक्तदान दिन आयोजिला जातो. भारतीय संस्कृतीत दानाला अनन्य साधारण महत्त्व आहे. चरकांच्या शास्त्राप्रमाणे एखाद्याला जीवनदान देणे हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. रक्तदान म्हणजेच जीवनदान यात दुमत नाही. भारत जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश असून ही रक्तदानात मात्र खूप मागे पडला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) म्हणण्यानुसार देशाला प्रतिवर्षी एक कोटी युनिट रक्ताची आवश्यकता असते. परंतु केवळ पंच्याहत्तर लाख युनिट्स उपलब्ध होतात. लोकसंख्येच्या तुलनेत ही फार मोठी उणीव आहे. रक्तदान ही एक निरोगी आणि सकारात्मक



पद्धती आहे. निरोगी नागरिक हे देशाची अनमोल संपत्ती आहे आणि ही टिकवण्याची जबाबदारी आपणा सर्वांवर आहे. रक्तदान ही अविरत चालणारी सामाजिक चळवळ आहे. तिचा थेट संबंध प्राणदानाशी आहे. रक्तासंबंधित अनेक आजारावर मात करण्यासाठी दैनंदिन जीवनात रक्ताची मोठी गरज भासते. मोठ्या संख्येत रक्ताची गरज असणाऱ्या आजारांमध्ये थॅलेसिमिया, रक्त कर्करोग, ॲप्लास्टिक ॲनिमियाचे रुग्ण, रक्तस्राव . रक्तविकार असलेले रुग्ण. दीर्घ शस्त्रक्रिया, गर्भवती महिला, शिवाय अपघातग्रस्तांना रक्ताची प्रामुख्याने गरज भासते. तसेच विविध रक्तविकारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना त्यांच्या शरीरात रोगप्रतिकारशक्ती निर्माण होण्याच्या हेतूने सतत रक्त संक्रमणाची गरजही असते. ही गरज भागविण्यासाठी रक्तदानाशिवाय दुसरा पर्याय उरत नाही. रक्तदान करणे हे संपूर्ण ऐच्छिक असून मानवतावादी उदात्त कार्य आहे. जर आपल्याला आपल्याच परिसरातील एखाद्या व्यक्तीला रक्ताची उणीव भासत असेल तर त्या रुग्णाकरिता रक्त रक्तदानासाठी निः संकोचपणे समोर यायला हवे. तसेच त्याच्या निरोगी आरोग्यासाठी योगदान देणे आपले कर्तव्य मानले पाहिजे.रक्तदान हे उदात्त कार्य आहे जे केवळ रक्तदात्याच नव्हेतर रुग्णाला देखील मदत करते. म्हणजेच रक्तदान ही डबल बेनिफिट कृती आहे. प्रत्येक रक्तदात्यानी रक्तदानाकडे आरोग्य सुधारण्याचा एक सुलभ पुण्यमार्ग मानला पाहिजे. प्रत्येक एका रक्तदानामुळे दात्याचे अंदाजे ६००ते ६५० कॅलरीज बर्न होतात. कारण आपले शरीर दान केलेल्या रक्ताची



जागा घेण्याची काम करते. रक्तदान केल्यानंतर ४८ तासाच्या आत दात्यांच्या शरीरात नवीन लाल रक्तपेशी तयार करण्यास सुरुवात होत असते. त्यामुळे चैतन्य राखण्यास सहाय्यकारी ठरते. मानवाला शारीरिक फायद्याच्या व्यतिरिक्त रक्तदान हे वैद्यकीय परिस्थितीसाठी एक प्रभावी उपचारांचा पर्याय सुद्धा बनला आहे. संशोधनानुसार असे सांगितले जाते की, रक्तदात्याचे मानसिक आणि भावनिक आरोग्यात सुधारणा सुद्धा होते. सातत्याने रक्तदान करणारे समाजामध्ये मानवतावादी मजबूत संबंध निर्माण करतात. तसेच रक्तदाता प्रत्येकासाठी आरोग्य सेवेला समर्थन देणाऱ्या, काळजी घेणाऱ्या यंत्रणेचा भाग ही बनतो. ही सवय इतरांसाठी जीवन रक्षक आहे. आज रक्तदानाविषयी समाजात प्रचंड गैरसमज आणि नकारात्मक दृष्टिकोन आहे .तो दूर करण्यासाठी सातत्याने विशेष प्रयत्न व्हायला पाहिजे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात, शहरात लोकसंख्येच्या घनतेनुसार रक्त संकलन केंद्रे उभी होणे काळाची गरज बनली आहे. रक्त हे विनामूल्य उपलब्ध आहे. रक्तांची विक्री व काळाबाजार थांबवण्यासाठी रक्तांची उपलब्धी स्थळ, काळानुरूप होणे अत्यंत गरजेचे ठरते.आजच्या रक्तदान दिवसाकडे रक्तदात्याप्रति कृतज्ञ होणेच मर्यादित नसून रक्ताची कमतरता होऊ नये. याकडेही गांभीर्याने लक्ष देणे क्रमप्राप्त ठरते.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा,जि. यवतमाळ
मो:९१३०८३५४५८

# तेरणा अभियांत्रिकीच्या ई टी सी विभागाच्या फायनल इयर विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात

आरंभ मराठी | धाराशिव

तेरणा अभियांत्रिकीच्या ई टी सी विभागाच्या फायनल इयर विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला. विभागाच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनी हा निरोप समारंभ आयोजित केला होता. कॉलेजचे प्राचार्य डॉ.विक्रमसिंह माने तसेच सर्व विभाग प्रमुख या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तर अध्यक्षस्थानी ई टी सी विभाग प्रमुख डॉ. प्रशांत कोल्हे उपस्थित होते.कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजन आणि दीप प्रज्वलन करून झाली. यावेळी अनुष्का मसलेकर हिने सुंदर स्वागत गीत सादर करून सर्वांची वाहवा मिळवली.त्यानंतर व्यासपीठावरील मान्यवर सर्व शिक्षक वृंद आणि फायनल इयरचे विद्यार्थी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.मागील अनेक वर्षांपासून कॉलेजचे विद्यार्थी त्यांच्यातील गुणवत्तेमुळे आणि कॉलेज मध्ये देण्यात येणाऱ्या अनेक ट्रेनिंग प्रोग्रॅम्स द्वारे वेगवेगळ्या बहुराष्ट्रीय कंपन्यात सिलेक्ट होतात. नामांकित कंपन्यामध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार यावेळी करण्यात आला. यावेळी मार्गदर्शनपर भाषण करताना प्राचार्य डॉ.माने यांनी विद्यार्थ्यांना उज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देऊन नोकरीसाठी उपलब्ध संधी विषयी माहिती दिली.विभाग प्रमुख डॉ.कोल्हे यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थ्यांचे कौतुक करून पुढील उत्तम भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी काही विद्यार्थ्यांनी समयोचित मनोगत व्यक्त करत कॉलेजचे आणि सर्व स्टाफचे त्यांच्या जडणघडणीत



हातभार लावल्या बद्दल आभार व्यक्त केले. कार्यक्रमासाठी ई टी सी विभागातील सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन वैष्णवी चिवरे हिने केले तर प्रा.वंदना मैंदरगी यांनी आभार प्रदर्शन केले.

# पावसाळ्यात आजारांपासून नागरिकांनी काळजी घेण्याचे प्रशासनाचे आवाहन

आरंभ मराठी | धाराशिव

पावसाळ्यात टायफॉईड, गॅस्ट्रो, डेंग्यू, मलेरिया यांसारख्या जलजन्य व कीटकजन्य आजारांचा धोका वाढतो. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी वैयक्तिक व सार्वजनिक स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मैनाक घोष व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सतीश हरिदास यांनी केले आहे. प्रत्येकाने पिण्याचे पाणी उकळून किंवा क्लोरीन टाकून प्यावे, उघड्यावरचे किंवा शिळे अन्न खाणे टाळावे, डासांचे उत्पादन रोखण्यासाठी पाणी साचू न देणे,गटारे व नाल्यांची स्वच्छता करणे, खिडक्यांना जाळ्या बसवणे आणि आठवड्यातून एक 'कोरडा दिवस' पाळणे आवश्यक आहे.



झोपताना मच्छरदाणी वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे.ताप, उलटी, जुलाब यासारखी लक्षणे आढळल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.कोणताही ताप अंगावर काढू नये किंवा स्वतःहून औषधोपचार करू नये. सर्पदंश किंवा तत्सम आपत्कालीन प्रसंगी १०२ किंवा १०८ वर संपर्क साधावा. सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांना सज्ज ठेवण्यात आले असून जिल्हास्तरीय साथरोग नियंत्रण कक्षही कार्यरत आहे. नागरिकांनी स्वच्छता व खबरदारी बाळगून प्रशासनास सहकार्य करावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

# समाधान बाराते यांची कळंब-धाराशिव शिवसेनेच्या विधानसभा संघटकपदी निवड

आरंभ मराठी | कळंब

शिवसेना (उ.बा.ठा.) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आदेशानेधाराशिवजिल्ह्यातीलशिवसेनापदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या नुकत्याच जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये कळंब – धाराशिव विधानसभेसाठी संघटक म्हणून कळंब तालुक्यातील संजीतपुरच्या समाधान बाराते यांच्यावर जबाबदारी सोपवली आहे. ही घोषणा शिवसेना भवन, मुंबई व शिवसेनेचे मुखपत्र सामना मधून करण्यात आली. राजकारण आणि समाजकारण यामध्ये तळमळीने आणि निष्ठेने काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करत पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या आदेशाने ही जबाबदारी सोपवली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून समाधान बाराते हे शिवसेनेचा प्रचार व प्रसार ग्रामीण पातळीवर अत्यंत जोमाने करत आहेत . बाराते यांनी निराधार लोकांसाठीच्या योजनेचा, शेतकऱ्यांसाठीच्या योजनांचा लाभ लोकांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. सर्व शासकीय योजनांची माहिती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचविण्याचे काम करत आहेत. या सर्व कामांमुळे खा. ओमराजे



निंबाळकर व आ. कैलास पाटील यांनी त्यांच्या कार्यावर विश्वास ठेवून पक्षकार्य अधिक गतिमान करण्यासाठी त्यांची नियुक्ती केली आहे. बाराते यांच्या निवडीमुळे शिवसैनिक व युवकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध सामाजिक, राजकिय, व सांस्कृतिक क्षेत्रांमधुन त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# विमान दुर्घटनेतील मृतांना श्रद्धांजली



आरंभ मराठी | धाराशिव

अहमदाबाद विमान दुर्घटनेतील मृतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंचच्या वतीने भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंचचे अध्यक्ष प्रा.रवी सुरवसे, सचिव डॉ. दिनकर झेंडे, शिक्षण विस्तार अधिकारी जगदीश जाकते, सामाजिक कार्यकर्ते पृथ्वीराज चिलवंत, विजय बनसोडे, उमाजी गायकवाड, प्रा. उमेश कांबळे, मारोती पवार, मिलिंद जानराव, राजेंद्र अंगरखे, सी. के. मस्के, प्रा. अंबादास कळासरे, व्ही.एस. गायकवाड, गौतम रणदिवे, स्वराज जानराव, अतुल लष्करे, प्रभाकर सोनवणे, सुनील माळाळे, धनंजय वाघमारे, नागनाथ गोरसे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# उमरगा येथील आदिती बनसोडे हिचे नीट परीक्षेत ४३५ गुण मिळवून यश

आरंभ मराठी | उमरगा

उमरगा शहरातील सामाजिक कार्यकर्ते अशोक बनसोडे यांची कन्या अदिती बनसोडे हिने मेडिकलसाठी आवश्यक असणारी नीट परीक्षा दिली. त्याचा निकाल नुकताच जाहीर झाला. यामध्ये तिने ४३५ गुण मिळवून यश मिळवले आहे. या नेत्रदीपक यशाबद्दल संविधान विचार मंचाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यामध्ये महादेव पाटील, विठ्ठल सूर्यवंशी, सोहेल इनामदार, प्रवीण कोराळे, नितीन कांबळे, प्रकाश सोनकांबळे आदी उपस्थित होते. ग्रामीण भागातील रुग्णांची सेवा करण्याचा मानस अदितीने या पूर्वी नीट परीक्षेत आलेले अपयश पुसून अभ्यासात सातत्य




ठेवून यश मिळवले. यंदाच्या नीटच्या परीक्षेत नेत्रदीपक यश मिळवल्याने त्याच्यावर परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. पुढे जाऊन नामांकित कॉलेजमध्ये एम.बी.बी.एस. ची पदवी संपादित करून ग्रामीण भागातील रुग्णांची सेवा करण्याचा त्याचा मानस आहे.

# संजय घोडावत इन्स्टिट्यूटला बेस्ट इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट ऑफ द इयर २०२५ पुरस्कार

आरंभ मराठी | कोल्हापूर

शिक्षणाच्या क्षेत्रात गुणवत्ता, नवोपक्रम आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या संजय घोडावत इन्स्टिट्यूट, अतिग्रे या नामवंत संस्थेला एक मोठा सन्मान प्राप्त झाला आहे. नवभारत एज्युकेशन समिट २०२५ मध्ये संस्थेला ''बेस्ट इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूट ऑफ द इयर'' हा मानाचा मानला जाणारा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.हा पुरस्कार महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री मा. श्री. आशिष शेलार आणि उत्तर प्रदेश राज्याचे कॅबिनेट मंत्री मा. श्री. आशिष सिंह यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. इन्स्टिट्यूट चे संचालक, डॉ. विराट गिरी यांनी पुरस्कार स्वीकारला आहे. शिक्षणाच्या क्षेत्रातील उत्तुंग कार्य, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, उद्योग संलग्न अभ्यासक्रमांची अंमलबजावणी आणि विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी संजय घोडावत इन्स्टिट्यूटने केलेल्या कामाचे हे मोठे गौरवचिन्ह ठरले आहे.''पुरस्कार स्वीकारताना इन्स्टिट्यूट चे संचालक डॉ. गिरी म्हणाले सर्व विभागाचे विभागप्रमुख, सर्व विषयाचे प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अविरत परिश्रम आणि एकसंघ प्रयत्न आहेत. संस्थेने गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधन, स्टार्टअप्ससाठी पोषक वातावरण, आणि नवनवीन प्रयोगशील



उपक्रमांची रचना करून दिली आहे. म्हणून हे इन्स्टिट्यूट आदर्श शिक्षणसंस्था म्हणून स्थान निर्माण करत आहे.'संजय घोडावत इन्स्टिट्यूटने मिळवलेल्या या यशाने कोल्हापूर जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातून शुभेच्छा चा वर्षा होत आहे. संजय घोडावत विद्यापीठाचे चेअरमन संजय घोडावत, विश्वस्त विनायक भोसले, यांनी या पुरस्काराबद्दल सर्व स्टाफ आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून, भविष्यात आणखी उच्च शिखरे गाठण्याचा शुभेच्छा दिल्या आहेत.

# अतिक्रमित बांधकाम थांबवा,अन्यथा आंदोलनाचा होळकर ट्रस्टचा इशारा



आरंभ मराठी | पुरंदर

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा जेजुरी येथील २६५ वर्षापुर्वीच्या वाड्याभोवती नव्याने होत असलेल्या बांधकामामुळे ऐतिहासिक वाडा जमीनदोस्त होण्याच्या मार्गांवर असून, वाड्याच्या वापरात असलेल्या इमारतीच्या अंतरभागात भेगा पडून तडे जाऊन वाडा कोणत्याही क्षणी कोसळण्याच्या मार्गांवर आहे. त्यामुळे वेळीच लक्ष न दिल्यास आणि नवीन बांधकाम न थांबविल्यास एक उत्तम बांधकाम शैलीची देवी अहिल्याची ऐतिहासिक वास्तू नष्ट होईल, अशी भीती व्यक्त करत स्थानिक नगर पलिका प्रशासन आणि पोलीस प्रशासनास निवेदन देण्यात आले असून संपूर्ण धनगर समाज रस्त्यावर उतरेल असा इशारा खाजगी देवी अहिल्याबाई होळकर चॅरिटी ट्रस्टच्या वतीने देण्यात आला आहे.

दैनिक आरंभ मराठी

www.arambhmarathi.com

आपलं धाराशिव.

रविवार दि.15 जून 2025

# आपत्कालीन परिस्थितीत मदत कार्यासाठी एनडीआरएफ,एसडीआरएफ पथके सतर्क

## राज्यात सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वाधिक ७०.३ मिमी पाऊस

आरंभ मराठी | मुंबई

अतिवृष्टी आणि संभाव्य पूर परिस्थिती बाबत उपाय योजना म्हणून एनडीआरएफ, एसडीआरएफ पथकांना आपत्कालीन परिस्थितीत सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यात मागील २४ तासामध्ये (१४ जून रोजी सकाळपर्यंत) सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वाधिक ७०.३ मिमी पाऊस झाला आहे. तर रत्नागिरी जिल्ह्यात ४५ मिमी, मुंबई शहर २५.४, पुणे २३.८ आणि रायगड जिल्ह्यात २० मिमी पावसाची नोंद झाली असल्याची माहिती राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून देण्यात आली आहे. राज्यात कालपासून आज १४ जून २०२५ रोजी सकाळपर्यंत झालेल्या पावसाची सरासरी आकडेवारी पुढीलप्रमाणे (सर्व आकडे मिलिमीटरमध्ये) :- ठाणे ३.४,रायगड २०, रत्नागिरी ४५, सिंधुदुर्ग ७०.८, पालघर ०.२, नाशिक १०.५, धुळे २.२, नंदुरबार ४.६, जळगाव ४.८, अहिल्यानगर ५.५, पुणे २३.८, सोलापूर ५.९, सातारा ८.८, सांगली २.६, कोल्हापूर ७, छत्रपती संभाजीनगर १६.७, जालना ७.८, बीड ७.६, लातूर २, धाराशिव ९.५, नांदेड ०.६, परभणी ०.७, हिंगोली ०.८, बुलढाणा २.७, अकोला ३, वाशिम १.८, अमरावती ०.६, यवतमाळ ०.८, नागपूर २.४, भंडारा ३.४, गोंदिया १.१, चंद्रपूर ०.४ आणि गडचिरोली ०.२.



### इंद्रायणी नदी पात्रात देहू,आळंदी येथे एसडीआरएफ व एनडीआरएफ पथक

आषाढवारी निमित्ताने इंद्रायणी नदी पात्रात मोठ्याप्रमाणात भाविकांची गर्दी होत असते. त्यामुळे खबरदारीचा उपाय म्हणून राज्य आपत्ती प्रतिसाद दलाचे (एसडीआरएफ) एक पथक देहु येथ तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाचे (एनडीआरएफ) एक पथक आळंदी येथे तैनात राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### दोन व्यक्ती,तीन प्राण्यांचा मृत्यू

राज्यात अहिल्यानगर जिल्ह्यात वीज पडून दोन प्राण्यांच्या मृत्यू, नाशिक जिल्ह्यात वीज पडून एका प्राण्याचा मृत्यू, पुणे जिल्ह्यात वीज पडून एक व्यक्ती मृत्यू आणि छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात भिंत पडून एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे.रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूरमधील अडीवरे गावात अतिवृष्टीमुळे पूर परिस्थिती निर्माण होऊन पुलावरुन पाणी वाहत होते. स्थानिक प्रशासनाकडून वाहतुक बंद करण्यात आली होती. याबाबत स्थानिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.ठाणे जिल्ह्यातील तुर्भे एमआयडीसी येथे जनरेटरच्या धुरामुळे ग्रस्त झालेल्या २८ लोकांपैकी २६ व्यक्तींना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले असून दोन व्यक्ती रुग्णालयात उपचार घेत असल्याचे राज्य आपत्कालीन कार्य केंद्राकडून कळविण्यात आले आहे.

# माजी मंत्री बच्चू कडू यांच्या समर्थनार्थ प्रहार संघटनेचे आंदोलन



आरंभ मराठी | धाराशिव

प्रहार संघटनेचे अध्यक्ष माजी मंत्री बच्चू कडू यांनी विविध मागण्यांसाठी अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. या आंदोलनाच्या समर्थनार्थ धाराशिवच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रहार संघटनेच्या वतीने एकदिवसीय लाक्षणिक आंदोलन करण्यात आले. प्रहार दिव्यांग क्रांती संघटना महाराष्ट्र राज्य या संस्थेच्यावतीने बच्चुभाऊ कडू यांच्या नेतृत्वाखाली श्री क्षेत्र गुळगुंजी (मोजरी) येथे दिनांक ०८ जून २०२५ पासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु आहे. तरीही शासनाकडून मागण्यांबाबत अद्यापपर्यंत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नाही. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी व शासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रहार दिव्यांग क्रांती संघटनेच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाभरातून प्रहार चे कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते. यावेळी काही कार्यकर्त्यांनी आंदोलनाला समर्थन म्हणून मुंडन करून घेतले. यावेळी शासनाच्या धोरणांवर टीका करून घोषणा देण्यात आल्या.

# कळंब येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा अधिवेशन उत्साहात

### कॉ.पंकज चव्हाण यांची जिल्हा सचिवपदी फेरनिवड; कौन्सिलमध्ये नव्या दमाच्या नेतृत्वाची भर

आरंभ मराठी | उमरगा

भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे (CPI) शताब्दी वर्ष साजरे होत असताना धाराशिव जिल्ह्याचे त्रैवार्षिक अधिवेशन कळंब शहरात उत्साहात पार पडले. पक्षाच्या महाराष्ट्र राज्य अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर (जे की २२ ते २४ जून, नाशिक येथे होणार आहे), जिल्हा स्तरावर पक्ष संघटन बळकट करण्यासाठी आयोजित हे अधिवेशन विचारमंथनाचा व रणनीती ठरविण्याचा मंच ठरले. अधिवेशनाचे उद्घाटन कॉ. अभय टाकसाळ यांनी केले. यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे बाळासाहेब धस, तसेच रिपब्लिकन सेनेचे अनिल हजारे यांनी शुभेच्छा देऊन आपले मनोगत व्यक्त केले. उद्घाटन सत्राचा समारोप कॉ. रेणके यांनी प्रभावी भाषणाने केला. कॉ. अभय टाकसाळ यांनी आपल्या निरीक्षणामध्ये सांगितले की,''राज्यात व देशात सध्या भाजपा सरकार आहे, जे संपूर्णपणे जनता



विरोधी धोरणे राबवत आहे. शेतकरी, कामगार, कर्मचारी यांच्या ज्वलंत प्रश्नांवर सरकारला जाब विचारण्याची हीच योग्य वेळ आहे. आता दुसऱ्या स्वातंत्र्यलढ्यासाठी जनतेला संघटित करावे लागेल. आणि हा काळ डाव्या विचारांसाठी पोषक आहे.'या अधिवेशनात नवीन जिल्हा कौन्सिलची निवड करण्यात आली. या कौन्सिलमध्ये कॉ. अरुण रेणके, आकाश शिंदे, वैशाली जाधव, अजित माळी, शुभम तातूडे, बाळासाहेब गिरी यांच्यासह एकूण ११ सदस्यांची निवड झाली. तसेच, कॉ. पंकज चव्हाण यांची पुन्हा एकदा जिल्हा सचिवपदी फेरनिवड करण्यात आली असून, कॉ. सुनीता चावला व कॉ. अजहर शेख यांची सहसचिवपदी निवड झाली आहे. नव्याने निवडले गेलेल्या या टीम कडून जिल्ह्यातील पक्ष कार्याला नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# १९९५ च्या बॅचचे विद्यार्थी एकत्र,३० वर्षानंतर पुन्हा वाजली शाळेची घंटा

## काजळा येथील रामानंद महाराज विद्यामंदिरच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

आरंभ मराठी | धाराशिव

धाराशिव तालुक्यातील काजळा येथील रामानंद महाराज विद्यामंदिरात ३० वर्षानंतर माजी विद्यार्थ्यांसाठी शाळेची घंटा पुन्हा वाजली. तब्बल तीस वर्षांनी १९९५ च्या बॅचच्या विद्यार्थ्यांनी एकमेकांना भेटल्यानंतर सर्वांचे डोळे आनंदाश्रूंनी पाणावले होते.

माजी विद्यार्थी, विद्यार्थिनींनी शाळा आणि शिक्षकांविषयी आदरभाव व्यक्त करुन जुन्या आठवणींना उजाळा दिला. काजळा येथील रामानंद महाराज विद्यामंदिरात १९९५-९६ साली दहावी झालेल्या विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात उत्साहात पार पडला. या बॅचचे विद्यार्थी आज वेगवेगळ्या क्षेत्रात कार्यरत आहेत. विद्यार्थ्यांनी एकत्र येण्यासाठी व्हाटसअप ग्रुप तयार केला. सर्वांच्या सोयीनुसार स्नेहमळावा घेण्यासाठी तारीख निश्चित करण्यात आली. सर्वांना भेटता येणार याचा आनंद सर्वांनाच होता. एकुण ७० विद्यार्थी, विद्यार्थिनी स्नेहमेळाव्यासाठी एकत्र आले. शाळेत आल्यानंतर माजी विद्यार्थ्यांसाठी ३० वर्षानंतर शाळेची घंटा पुन्हा वाजली. त्यानंतर सर्वांनी प्रार्थना व राष्ट्रगीत गायले. त्यानंतर माजी विद्यार्थ्यांना छडी मारत गुरुजींनी वर्गात प्रवेश दिला. या बॅचला शिकविणारे मुख्याध्यापक



शिवाजी वागदकर, जि.प. शाळेचे आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त अली मेहताब शेख, अरुण सातपुते, भीमाशंकर शिवपुरे, भीमाशंकर मळेवाडी व इतर शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्नेह मेळाव्यानिमित्त माजी विद्यार्थ्यांच्या वतीने शाळेला प्रोजेक्टर भेट देण्यात आला. रामानंद महाराज मंदिराच्या सभागृहात विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करताना आपल्या भावनांना वाट मोकळी करुन दिली. जुन्या आठवणींना उजाळा देताना सर्वांचे डोळे पाणावले होते.त्यानंतर रामानंद महाराज यांची प्रतिमा देऊन सर्व विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

# मंजूर असलेल्या १०० बेड उपजिल्हा रुग्णालयासाठी जमीन संपादीत करा, अन्यथा आरक्षण उठवा

### दीपक लोंढे यांची पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी

आरंभ मराठी | तुळजापूर

तुळजापूर येथील मंजूर असलेले १०० बेडच्या उपजिल्हा रुग्णालयाच्या वाढीसाठी तुळजापुर विकास योजनेतील आरक्षण क्र.४२ मधील क्षेत्र २.५४ हेक्टर इतके क्षेत्र शासनामार्फत खरेदी करण्यासाठी मार्गदर्शन व निधी उपलब्धतेबाबत पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना दिपक लोंढे यांनी निवेदन दिले. ग्रामीण रुग्णालय, तुळजापूर हे सर्व्हे नं.१३७/१ मध्ये कार्यरत आहे. सदरील ग्रामीण रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन १०० खाटाचे उपजिल्हा रुग्णालय मंजूर करण्यात आलेले आहे. तुळजापूर हे



तिर्थक्षेत्र असल्यामुळे येथे येणाऱ्या भाविकांची संख्या व तालुक्यातील तसेच इतर राज्यातील रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे सध्या रुग्णालयाच्या ताब्यात आलेली जागा अपुरी पडत आहे. दिपक लोंढे यांनी पालकमंत्री यांच्याशी सविस्तर चर्चा करून निवेदन दिले आहे. याप्रसंगी माजी आमदार ज्ञानराज चौगुले उपस्थित होते. तसेच याविषयी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, आरोग्यमंत्री, विभागीय आयुक्त यांनाही याबाबत निवेदन सादर करण्यात आले आहे. याविषयी जुलै २०२३ पासून पाठपुरावा करत असून वेळोवेळी निवेदने प्रशासन व राज्यसरकारला दिलेले आहेत. ग्रामीण रुग्णालय वाढीसाठी आरक्षण क्र.४२ असे आरक्षीत केले असल्याचे अवगत करून जमिन संपादीत करून दिपक लोंढे यांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानुसार चालू बाजारभावाच्या पाचपट मोबदला देण्यात यावा अथवा सदर जमिनीवरील आरक्षण उठविण्यात येऊन सदर जमीन विकसित करण्यासाठी परवानगी देण्यात यावी असे म्हंटले आहे. याबाबत दिनांक १४ ऑगस्ट पर्यंत योग्यतो निर्णय घ्यावा अन्यथा नाईलाजास्तव उपोषणाचा मार्ग अवलंबावा लागेल असा इशारा देखील दिपकराज हिम्मतराव लोंढे यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे.

# कुणबी मराठा परिवाराकडून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

आरंभ मराठी | मुरुड

मुरुड येथे शुक्रवारी (दि.१३) सरस्वती फंक्शन हॉल येथे कुणबी मराठा समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास प्रमुख पाहूणे म्हणून कुणबी मराठा सेनेचे संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ कोळसुरे, लातूरचे माजी महापौर सुरेश पवार , कुणबी मराठा सेनेचे मराठवाडा अध्यक्ष आशोकराव कातळे, सचिव कुणबी सेना गोविंदराव हालसे, माजी शिक्षण विस्तार अधिकारी व्यंकटराव गंगणे, माजी मुख्याध्यापक मुक्ताराम शिंदे , प्रा. सौदागर भिसे, श्रीमती पद्मीनी हवालदार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला. तत्पूर्वी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सुरुवात करण्यात आली. तसेच गुजरात येथील विमान दुर्घटनेत मृतृमुखी पडलेल्यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. त्या नंतर सर्व प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला



व नंतर कुणबी मराठा समाजातील दहावी व बारावीत उत्तीर्ण झालेल्या ४० विद्यार्थीचा शाल, श्रीफळ, फेटा, पुष्पहार, ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. व्यंकटराव गंगणे यांनी कार्यक्रमाची रुपरेषा सांगून सर्वजण एकत्र येऊन गेल्या वर्षभरात काय काय कार्यक्रम राबवले याची सविस्तर माहीती दिली.प्रा सौदागर भिसे यांनी दहावी बारावीनंतर काय करावे तसेच अभ्यासावर कसा भर द्यावा, पालकांनी काय करावे याचे सविस्तर मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या. त्यानंतर आशोकराव कातळे यांनीही मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. अध्यक्षीय भाषणातून विश्वनाथ कोळसुरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले .या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन बालाजी धोत्रे यांनी केले तर सूत्रसंचालन वैजिनाथ हराळे यांनी केले. या कार्यक्रमास दहावी व बारावीतील सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांसह आईवडील उपस्थित होते. तसेच मुरुड शहरातील कुणबी मराठा समाजातील सर्व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बाळासाहेब खराडे,विशाल हवालदार, लिंबराज सुर्यवंशी, शाम खराडे, रवी सूर्यवंशी, बलभीम हवालदार,खंडू कोरडे,आमोल क्षीरसागर,कृष्णा घेंबड, पंजाब पवार, नाना क्षीरसागर, संतोष डांगे,लहू कावळे, हणुमंत इंगळे, अक्षय खराडे,बाळराजे इंगळे,भागवत खराडे,विक्रम खराडे, दिपक नरवडे, पवार साहेबा , काकासाहेब देशमुख ,अरविंद हवालदार, बालाजी नरवडे, दिलीप गंगणे, चंद्रकांत सुरवसे, बबन खराडे, धनंजय हवालदार, अजय हवालदार यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केला.

# उमरग्यात प्रहार अपंग संघटनेच्या आंदोलनाला पाठींबा; बाळासाहेब ठाकरे चौकात रस्ता रोको

## आमदार बच्चू कडू यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ रास्ता रोको

आरंभ मराठी | उमरगा

प्रहार अपंग क्रांती संघटनेचे नेते व माजी मंत्री बच्चू कडू यांनी दिव्यांग, शेतकरी, विधवा व ग्रामीण गरजूंसाठी केलेल्या विविध १७ मागण्यांच्या समर्थनार्थ दि. ८ जूनपासून गुरुकुंज मोझरी (आशी: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधी) येथे बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू केले आहे. त्यांच्या या लढ्याला पाठिंबा देण्यासाठी उमरगा तालुक्यातील शेतकरी, दिव्यांग व विविध संघटनांनी (ता. १४ जून) रोजी बाळासाहेब ठाकरे चौकात तीव्र रस्ता रोको आंदोलन केले. या आंदोलनाच्या माध्यमातून आंदोलकांनी सरकारकडे मुख्यत: दिव्यांग व विधवांना दरमहा ६ हजार रुपये मानधन द्यावे, शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करावी, शेतीमालाला हमीभाव मिळावा, शहरी व ग्रामीण भागातील सर्व नागरिकांना समान ५ लाख रुपयांचे



घरकुल अनुदान मिळावे, तसेच पेरणी ते कापणीपर्यंतचा संपूर्ण खर्च एमआयजीएस (महाराष्ट्र इन्शुरन्स गारंटी स्कीम) अंतर्गत द्यावा या प्रमुख मागण्या मांडण्यात आल्या. रस्ता रोकोमुळे काही काळ वाहतूक विस्कळीत झाली. या वेळी उमरगा पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक अश्विनी भोसले यांनी आपल्या सहकाऱ्यांसह योग्य बंदोबस्त ठेवत परिस्थिती नियंत्रणात आणली. आंदोलनस्थळी विविध पक्ष व संघटनांचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यामध्ये आ. प्रवीण स्वामी, वंचित बहुजन आघाडीचे रामभाऊ गायकवाड, छावा संघटनेचे युवक जिल्हाध्यक्ष बाळासाहेब माने, संभाजी ब्रिगेडचे तालुकाध्यक्ष अण्णासाहेब पवार, तसेच ईसाक शेख, रामेश्वर मदने, नागराज मसरे, राहुल मन्नाडे, नारायण भोसले यांचा समावेश होता. दिव्यांग बांधव, शेतकरी व नागरिकांचा मोठा सहभाग होता. प्रहारच्या आंदोलनाला उमरग्यात मिळालेला हा पाठींबा शासनाच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारा ठरत आहे. मागण्या मान्य न झाल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशाराही आंदोलकांनी दिला आहे.

# शिधापत्रिका धारकांना ई केवायसी करण्यासाठी पुन्हा मुदतवाढ

आरंभ मराठी | धाराशिव

शिधापत्रिकाधारकांनाई-केवायसीसाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जे शिधापत्रिकाधारक मुदतीत केवायसी करून घेणार नाहीत, त्यांना धान्याचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे लवकरात लवकर ई-केवायसी करून घ्यावी असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत धान्याचा लाभ घेणाऱ्या सर्व शिधापत्रिकाधारकांसाठी ई-केवायसी प्रक्रिया बंधनकारक करण्यात आली आहे. शासनाने नागरिकांच्या मागणीनंतर ई-केवायसी पूर्ण करण्यासाठी ३० जून २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. शासनाच्या निर्देशानुसार ई-केवायसी प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे आवश्यक आहे. शिधापत्रिकाधारकांनी आपल्या जवळच्या रास्त भाव दुकानात जाऊन आधार क्रमांकासह बायोमेट्रिक पडताळणी करून ई-केवायसी लवकरात लवकर पूर्ण करावी. अन्यथा, अन्नसुरक्षा योजनेचा लाभबंद होण्याची शक्यता आहे. ई-केवाय धाराशिव सी प्रक्रिया ही अगदी सोपी, विनामूल्य व काही मिनिटांत पूर्ण होणारी आहे. नागरिकांनी कोणतीही दिरंगाई न करता आपल्या कुटुंबाच्या अन्न सुरक्षेसाठी ही प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी. असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# कत्तलीसाठी जनावरे घेऊन जाणारे दोन टेम्पो पकडले; दोघांवर गुन्हा दाखल

आरंभ मराठी | परंडा

कत्तलीच्या उद्देशाने दोन टॅम्पो मध्ये २६ गोवंशीय वासरे घेऊन जाणाऱ्या दोघांना परंडा पोलिसांनी ताब्यात घेतले. यासंबंधी सविस्तर वृत्त असे की,आरोपी दिपक शिंदे (रा. टेभुर्णी जि. पुणे) आणि गौस अब्बास कुरेशी (वय २७ वर्षे, रा. देवगाव रोड, परंडा) यांना दिनांक १३ जून रोजी कुर्डवाडी ते धाराशिव रोडवर परंडा शहरात डी एड कॉलेजच्या पाठीमागे पिकअप (क्र एमएच १२ ए.एक्स.६८८१) आणि पिकअप (क्र एमएच ०७ पी ०२७३) अशा दोन पिकअपमध्ये गोवंशीय जातीच्या २६ वासरांना घेऊन जात असताना ताब्यात घेतले. यावेळी १,३०,००० रुपये किंमतीच्या वाहनासह एकुण ११,३०,००० रुपये किंमतीची गोवंशीय वासरे त्यांच्या चारा पाण्याची व्यवस्था न करता निर्दयतेने कत्तलीसाठी बेकायदेशीर रित्या वाहतुक करताना परंडा पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द कलम ५(अ), ५(बी), ९(अ), ११ महाराष्ट्र प्राणी संरक्षण अधिनियम सह मपोका कलम ११९ सह प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१), ११(१)(ए), ११(१) (एफ), ११(१)(एच),११(१)(आय) ४७, ५४, ५६ प्राण्याचे परिवहन अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.